महाराष्ट्रातील लोककलांचा विचार करता भटक्या विमुक्त आदिवासींच्या लोककला व त्यांच्या लोककथांचा वापर, काही अपवाद वगळता, आपल्या व्यावसायिक व हौशी किती करतात ? किंबहुना त्यांनी या आदिवासी लोककला व लोककथांचा आपल्या संहितातून वापर केला तर ते नाटक रंजक होईल. त्याला ताल, लय व गती येऊन ते प्रेक्षकांच्या मनावर राज्य करील असे वाटते. या संबंधी गोमंतकीय लोककलांचा अभ्यास व वापरही रंगभूमीसाठी उपयुक्त ठरु शकतो असे वाटते. भारताच्या विविध प्रांतातील लोककलांचा अभ्यास करुन त्याचा वापर आपल्या नाटकातून केला गेला व तशा संहिता संशोधक दृष्टी असलेल्या लेखकांकडून लिहिल्या जाऊन त्या सादर झाल्या तर मराठी नाटक ख-या अर्थाने अखिल भारतीय होईल. आज मराठी रंगभूमी साता समुद्रापलीकडे जात आहे. वरील उपाय जर आपल्या रंगभूमीच्या निर्मात्यांनी केला तर मराठी रंगभूमीचे साचलेपण दूर होईल, असे वाटते. शेवटी नाटक हे मानवी संवेदनांचे संशोधन आहे. माणसाच्या संवेदनातूनच नवे नाटक जन्म घेते. व्यावसायिक रंगभूमी जे करु शकणार नाही ते हौशी रंगभूमी करु शकते. वस्तुस्थितीचे वास्तव धाडसाने समाजासमोर नाट्यकलेतून मांडू शकते. रंगभूमीवर काल काय झाले ? ह्याचे मंथन करण्यापेक्षा आत्ता व आज काय करता येईल ? ह्याचा विचार करुन तसा आचार करावा असे वाटते.

खरं तर आमच्या सर्वच लोककला व विधीकला ह्या पथनाट्येच होत्या. पण आजच्या पथनाट्यात विधीनाट्य नाही, आहे ते समाज प्रबोधन. एखाद्या ज्वलंत प्रश्नावर ते आधारित असते. समाजाचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर ही पथनाट्ये फार प्रभावी ठरु शकतील. पण प्रश्न पुन्हा सादरीकरणाचा. ह्यात नुसते कलावंत घेऊन चालणार नाही तर समाजाचा सर्वांगीण अभ्यास असणारे विचारी व कल्पक कलावंत ह्यात लागतील. ते आपला मुद्दा सादरीकरणाद्वारे ठोस मांडून समाजमन बदलवू शकतात. पण त्यासाठी चळवळीची गरज आहे.